**आकाशवाणी पुणे**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 20.08.2024** **वार– मंगळवार**

---

**बदलापूर**

बदलापूरमधील चिमुरड्यांवर शाळेत झालेल्या अत्याचारप्रकरणी आंदोलन करणाऱ्या नागरिकांना पुण्यातील विविध शाळांच्या पालक संघटनांनी पाठिंबा जाहीर केला असून सर्वप्रथम या शाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी केली आहे. घडलेल्या प्रकाराला शाळा व्यवस्थापनदेखील तेवढेच जबाबदार असून मुख्याध्यापिका आणि अन्य कर्मचा-यांना निलंबित करुन अथवा माफीनामा जाहीर करून उपयोग नाही तर चालू शैक्षणिक वर्षासाठी या शाळेची मान्यता रद्द करण्याची आग्रही मागणी करण्यात आली आहे. शाळेतील सीसीटीव्ही आणि अन्य यंत्रणा व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची असताना त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष झालं आहे शिवाय कामावर कर्मचारी नेमताना त्याचे पूर्व वर्तन तपासलं गेलं नाही हा देखील अक्षम्य हलगर्जीपणा असल्याचा आरोप पालक संघटनांनी केला आहे. या प्रकरणात कोणत्या विशिष्ट विचारसरणीचे लोक ही शाळा चालवत होते याकडं अधिक लक्ष दिलं गेलं असून त्यामुळंच संस्था वाचवण्याचे प्रयत्न होत असल्याचं दिसून येत आहे असा थेट आरोपदेखील पालक संघटनांकडून करण्यात आला आहे.

**मतदार**

यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन विज्ञान संस्थेमध्ये विशेष मतदार नोंदणी मोहिमेचं आयोजन करण्यात आलं होतं. निवडणूक विभागानं उपलब्ध करून दिलेल्या मतदार हेल्पलाईन ॲपद्वारे नमुना क्रमांक सहा भरुन मतदारनोंदणी करण्याविषयी प्राध्यापक महेश महांकाळ यांनी मार्गदर्शन केलं.

**मोहोळ**

समाज माध्यमावरील अभिव्यक्ती म्हणजे धनुष्यातून सुटलेला बाण असल्यामुळं त्याचा वापर करताना चांगल्या-वाईट परिणामांचा सांगोपांग विचार करून केला पाहिजे असं मत केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात व्यक्त केलं. कॅलिडस अकादमीच्या वतीनं 'डिजिटल मीडिया आणि नवे प्रवाह' या विषयावर आयोजित कार्यक्रमात मोहोळ बोलत होते.

**अपघात**

कल्याणीनगर अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने दोघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या दोघांनी अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अगरवाल यांना रक्ताचे नमुने बदल करण्यासाठी मदत केल्याचं उघड झालं आहे.

**कैदी**

येरवडा खुल्या कारागृहातून जन्मठेपेची शिक्षा भोगणारा कैदी पसार झाला आहे. या कैद्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. राजू दुसाने असं त्याचं नाव असून त्याला खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेप आणि दंडाची शिक्षा झाली होती. दुसाने याची वर्तणूक चांगली असल्यानं त्याची रवानगी खुल्या कारागृहात करण्यात आली होती.

**वाहतूक**

पुणे महापालिका हद्दीत नव्यानं समाविष्ट झालेल्या 34 गावांच्या परिसरात देखील अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध आणण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. शहरालगतच्या या परिसरात मोठ्या प्रमाणावर बांधकामं सुरु असल्यानं त्यासाठी लागणाऱ्या साहित्याची वाहतूक दिवसभर अवजड वाहनांच्या माध्यमातून सुरु असते, त्यामुळं वाहतुकीची कोंडी होते शिवाय अपघातांचा धोकादेखील वाढला आहे.

**पाणी**

पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असलेल्या किमान 115 जागांवर तातडीनं उपाययोजना करण्याची गरज असल्याचा अहवाल वाहतूक पोलीस आणि स्थानिक प्रशासनानं तयार केला आहे. गेल्या दोन दिवसांत झालेल्या पावसामुळं पुणे रेल्वे स्थानक परिसरात देखील मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं होतं.

**आंदोलन**

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांच्या वतीनं कंत्राटी कामगारांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज पुण्यात उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या घरासमोर निदर्शनं केली. आपल्या प्रलंबित मागण्यासाठी गेले अनेक दिवसांपासून हे कामगार आंदोलन करत आहेत. विविध मंजूर रिक्त पदांच्या जागेवर कार्यरत असलेल्या वीज कंत्राटी कामगारांना कंत्राटदार-मुक्त वयाच्या 60 वर्षांपर्यंत शाश्वत रोजगार देण्यात येऊन त्यांना वीज कंपनीच्या रिक्त पदांवर सेवेत सामावून घ्यावं ही त्यांची मुख्य मागणी आहे.

**अमली**

भोई प्रतिष्ठानच्या वतीनं गणेशोत्सव हा अमली पदार्थ आणि सायबर गुन्हेमुक्त होण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार असलयाची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉक्टर मिलिंद भोई यांनी पत्रकार परिषदेत दली. याअंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात येणार असून पुणेकरांनी आणि विद्यार्थांनी सहभागी होवून या राष्ट्र उभारणीच्या कार्यात हातभार लावावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**बुद्धिबळ**

राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त नववी डॉक्टर हेडगेवार स्मृती एक दिवसीय जलद बुद्धिबळ स्पर्धा रविवारी 25 ऑगस्टला क्रीडाभारती पुणे महानगरतर्फे आयोजित करण्यात आली आहे. 10 आणि 14 वर्षाखालील, त्याचप्रमाणं खुला गट अशा 3 गटांमध्ये घेण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी वीस हजार रुपयाची रोख पारितोषिकं देण्यात येणार आहेत.

**विसर्ग**

वडिवळे धरणाच्या सांडव्यातून कुंडली नदी पात्रामध्ये पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार या विसर्गात बदल करण्यात येईल त्यामुळे नागरिकांनी खबरदारी घ्यावी असं आवाहन पुणे पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी केलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान होतं. उद्याही अशाच हवामानासह कमाल तापमान 32 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**